# ना.भि
# नाना आणि भिन्न-भिन्न अनुभवांचे रसायन

प्रणोती प्रतिक्षा प्रल्हाद जाधव

AtharvaKunal Prakashan™
AK
अथर्वकुणाल प्रकाशन

All rights reserved along with e-books and layout. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, without the perior written consent of the Publisher and the licence holder.

Please contact us at **Athrvakunal Publication**, Satara: 415002
Mob. 9922553901, 9890600278
Email: atharvakunalprakashan@gmail.com / support@akes.co.in
Website: https://akes.co.in

• पुस्तकातील लेखकाची मते,घटना,वर्णने ही त्या लेखकाची असून त्याच्याशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.मराठी पुस्तक प्रकाशनाचे हक्क अथर्वकुणाल प्रकाशन,सातारा.

**Na.Bhi(Nana Ani Bhin-Bhin)Anubhavanche Rasayan By** Pranoti Jadhav

ना.भि(नाना आणि भिन्न-भिन्न)अनुभवांचे रसायन-प्रणोती जाधव/ललितसाहित्य

| | | |
|---|---|---|
| **प्रकाशन क्रमांक** | : | **३३** |
| © | : | **कु.प्रणोती प्रल्हाद जाधव** |
| **प्रकाशिका** | : | **सौ.महानंदा श्रीकृष्ण दळवी**<br>अथर्वकुणाल प्रकाशन,बी-१२,शुभंकर अपार्टमेंट,<br>६१५ मंगळवार पेठ,सातारा ४१५००२<br>भ्रमणध्वनी - ९८९०६००२७८, ९९२२५५३९०१ |
| **लेखिका** | : | **कु.प्रणोती प्रल्हाद जाधव**<br>चोरे रोड,पोलीस लाईन जवळ,उंब्रज,ता.कराड,जि.सातारा-४१५१०९.<br>भ्रमणध्वनी : ९१६८१३१६१२ |
| **मुद्रक** | : | शिवानी प्रिंटर्स,कसबा पेठ,पुणे |
| **पहिली आवृत्ती** | : | २८ मार्च २०२६ |
| **मुखपृष्ठ** | : | शुभम शिवाजी कदम |
| **किंमत** | : | ३८०/- रुपये |
| **P-Book ISBN** | : | 978-81-997194-7-7 |
| **Books Available on** | : | https://akes.co.in |

* पुस्तकांची पायरेटेड खरेदी-विक्री,झेरॉक्स काढणे हा कायद्याने गुन्हा आहे आणि अशा गुन्ह्याविरोधात कायदेशीर कारवाई होऊ शकते.सर्व वाद सातारा न्यायालयीन कक्षेत.

# समर्पण

सुख-दुःखानी प्रत्येक क्षण व्यापलेल्या,कडू-गोड आठवणींनी मंत्र मुग्ध केलेल्या,शुभ-आशिर्वादासह,चांगल्या-वाईट अनुभवांचं गाठोड मला प्रधान केलेल्या,प्रेम-घृणा यांस प्राप्त ठरवलेल्या,सुंदर,वळणदार, नाजुक,गोड,विरहीत, काटेरी,असह्य,अनमोल,साहसी अशा प्रकारचे अनुभव.
माझ्या जन्म-मृत्युच्या मध्य पटलावर बहाल केलेल्या,माझ्या प्रिय मित्र-मैत्रिणींना,जन्मदात्यांना,कुटुंबाला,समाजवर्गाला, चिंतकांना-हितचिंतकांना आणि माझ्या प्रिय वाचकांना हे पहिलं वहिलं पुष्प समर्पित.

प्रिय वाचकांनो,

कला,क्रीडा,शैक्षिणक ह्यांसारख्या क्षेत्रात पेलेल इतका पायंडा उचलून झाल्यावर,लेखन-साहित्यिक क्षेत्रात ह्या सळसळत्या तरुण वयात लाभलेले,लादलेले आणि स्वीकारलेले अनुभव वाचकांनसमोर लेखन स्वरूपात मांडण्याचा मोह आवरला नाही.खरंतर ना.भि. म्हणजेच नाना आणि भिन्न-भिन्न अनुभवांचे रसायन ह्या,पहिल्या-वहिल्या पुस्तकाची सांगड योग्य-रित्या मांडताना,अनेक निराळ्या विचारांची,अनुभवांची उलाढाल झाली आणि उत्तम लेखक नेहमी स्वतःला मांडताना प्रामाणिकतेची किनार जोडून,वास्तव सप्तरंगांनी पानावर रेखाटत असतो.शब्दांच्या सीमा तोडून अनुभवांचे अविष्कार उभे करतो आणि वाचक ही तितक्याच तळमळतेने त्याचा आनंद लुटतो.असंच माझ्या जीवनातलं पहिलंच नाना भिन्न-भिन्न प्रकारच्या अनुभवांचं रसायन आणि तुम्हांला तृप्त करण्यासाठीचा हा लहानसा अट्टाहास...!

प्रणोती प्रतिक्षा प्रल्हाद जाधव

# अभिप्राय

भावनांना शब्दात पकडणं ही लेखनाची सगळ्यात मोठी कसोटी असते. प्रणोती या कसोटीत पुर्ण सक्षमपणे असतात.त्यांच्या प्रत्येक शब्दात मानवी भावना ओतप्रोत भरलेल्या जाणवतात.

या पुस्तकांत केवळ भावनांचा धांडोळा घेतलाय असंही नाही, वास्तवाची जाणीव देखील करुन दिली आहे.म्हणूनच यातील प्रत्येक कागदाला प्रत्येक शब्दाला खरेपणाचा गंध आहे.

चार ओळींमध्ये आयुष्याचं सार सांगणं हे मोठं कौशल्य,या पुस्तकात मांडलं आहे.जीवनाच्या,वयाच्या प्रत्येक टप्प्यावर जाणवत असणाऱ्या जाणीवा सुंदर अधोरेखित झाल्या आहेत.

पुस्तकाचं बलस्थान म्हणावं किंवा खास वैशिष्ट्य म्हणावं म्हणजे हे पुस्तक साहित्याप्रमाणे सरळधापेत वाचावं असं अजिबात नाही, कोणतंही पान काढावं आणि रसग्रहण करावा,विचार करावा एवढी ताकद या साहित्यात सामावली आहे.

प्रणोती यांनी आणखी प्रगल्भ होत रहावं आणि मराठी साहित्यात अशीच सकस भर घालत रहावी याच शुभेच्छा...!!!



लेखक नितीन अरुण थोरात
सुर्याची सावली
(राज्यशासन श्री.ना.पेंडसे पुरस्कार प्राप्त)

वाचक पुस्तक निवडताना
आधी लेखक कोण आहे ते पहातो.
लेखक आवडला की,
मग,पुस्तकाच्या पृष्ठभागावरील
सारांश पाहून पुस्तके निवडतो.
पुस्तक वाचायला चालु
केलं की,त्यातला सारांश वाचकाच्या
जीवनाशी मिळता जुळता
असला कि,पुस्तक म्हणजे
त्यासाठी मेजवानीच.
तिखट,गोड,आंबट,खारट
आणि ह्याच्या उलट घडलं
की,प्रत्येक पान रटाळवाणं.
मग पुस्तक कमी पण,
पुस्तकाच्या पानाचे अंकच
खुप पाहिले जातात.
पंचपक्वांनातलं उरतं ते फक्त अळणी.
आणि लेखकाकडे
पाहुन शिव्यांचा भडीमार
वाचकाला सावरावा लागतो तो वेगळाच.

ARF
ना.भि । १

स्त्रीने रूपवान आणि पुरुष शरीर यष्टीने पीळदार, रुबाबदार असावा.असं कोण म्हंटलं.स्त्री गुणवान, झुंजार,स्वाभाविक आणि पुरुष कर्तृत्ववान,निर्भीड असला तरी उत्तम प्रपंच होतोच की.

**कला शिकण्याचं साधन न्हवे ती जन्मतःच उपजत येते फक्त,तिला दुरदृष्टीने ओळखून तिला आकार द्यायचा असतो.एकदा का आकार दिला की,मग माणूस सुखाच्या शोधात हिंडत नाही.त्याला कलेतच सुख,समाधान,मार्मिकता दिसू लागते.**

पुरुष नेहमी सुंदर स्त्रीच्या शोधात असतो.आणि स्त्री धनवान पुरुषाच्या शोधात पण,डोळसपने पाहिलं तर, पुरुषाला स्त्री मनमोकळी,स्वाभाविक आणि लाघवीच भावते.आणि स्त्रीला पुरुष आदर करणारा,निष्ठावंत आणि कर्तृत्वानच पसंतीस येतो.

**प्रत्येक जण जगण्यासाठी संघर्ष करत**
**राहतो.शेवटी कोण कसा मरतो,**
**त्यावरच त्याची मृत्यूनंतरची**
**कीर्ती अवलंबून.**

माणसाने चातुर्याचा वापर करावा.
पण कसा,कुठे,करतो ह्याचंही
चिंतन करणं गरजेच आहे.त्यात जर,
धर्माची स्थापना नसेल तर मग
अंत हा कर्ण आणि शकुनीसारखा
व्हायला वेळ लागत नाही.

**सगळ्या कलांपेक्षा सोपी कला**
**म्हणजे जीवनाची कला.फक्त स्वतःचे**
**विचार आणि निसर्गाची किमया**
**समजायला हवी.**

प्रत्येकाची प्रेमाची व्याख्या ही वेगवेगळी.
कोण माणसांवर करतं,तर कोण
माणुसकीवर,कोण प्राणी,झाड,
पशु,पक्षी प्रत्येकाची प्रेमाची व्याख्या

परिस्थिती वाईट असेल,अनेक
संकटांनी घेरलं असेल तेव्हा
बुद्धी भ्रष्ट होण्याच्या मार्गावर असते.
चक्रव्युवहात अडकल्यावर बाहेर
मार्गदर्शन करणाऱ्याचा सल्ला घेतला
की,अनेक धर्म संकटांपासून बचाव होतो.

नावलौकीक,पैसा मिळवता येतो पण
ते टिकवून ठेवणं फार धैर्याचं काम.

समोरचा कोणत्या उद्देशाने  वाच्यता
करतोय हे न समजल्यानेच,कित्येक
युद्ध घडतात.

**स्त्रीला योग्य वेळी,योग्य ठिकाणी,**
**योग्य प्रकारे 'नाही' ह्या शब्दाचा प्रयोग**
**करता आला की,पुरुषाला 'पुरुषार्थ'**
**गाजवण्याचा अधिकार प्राप्त होत नाही.**

**बलात्कार,विनयभंग हा गुन्हा फक्त**
**ओसाड मार्गावर एका स्त्रीचाच होतो**
**असं नाही.भरल्या घरात स्त्रीच्या मनाविरुद्ध**
**केलेली जवळीक ही,गुन्ह्यासच पात्र ठरते.**

त्याचा मोठा साहेब असतो.प्रत्येकाची सही मात्र जीवाचा
आटापिटा करून मिळवावी लागते,तेव्हा हव्या
असलेल्या कागदाची पुर्तता होते.ह्यात भरलडा जातो
मात्र सर्व साधारण आणि मध्यमवर्गीय माणूस.

**मी माझ्या जन्मापासून आजूबाजूच्या स्त्रीयांना पाहत आले.स्त्री म्हणून जन्माला आल्या म्हणून,त्यांनी स्वतःच स्वतःवर कित्येक बंधन लादली गेलेली पाहिली. पुरुषानंतर स्त्रीचं दुय्यम स्थान असतं म्हणून तिला निर्णय घेण्याचा अधिकार नाही.असं त्यांच्या-त्यांच्यातच ठरवून मोकळ्या होतात.राहिलेल्या करता येणाऱ्या गोष्टी ही समाजाच्या भीतीने ती वज्र करतात आणि स्वतःचं स्वतः च्या प्रगतीच्या कक्षा चार-चौघांच्या विचाराने खुंटवून घेतात आणि समाजाने,कुटुंबाने, नवऱ्याने किती अन्याय केला हेच घोकत रहातात.निर्णय क्षमतेला मात्र शुन्य किंमत देऊन मोकळ्या होतात.वरून स्त्रीला समाज संधी देत नाही. ह्याचा स्वतःचाच पाढा घोकून मोकळ्या होतात.ह्याचा दोष मात्र कोणावर लादता येत नाही कारण,स्वतःनेच स्वतःच्या मर्यादा आखलेल्या असतात.ज्या कोणीही तोडू शकत नाही.**

बालवयातले दुर्मिळ फोटो तरुणपणातले क्षण
कुतूहलाने आणि आनंदाने भरून टाकतात.

प्रत्येक माणूस हा दहा वर्षांपूर्वी भेटलेला

ARF

*वाचकांनो...तुमच्यासाठी चं पत्र*

माझ्या प्रिय वाचकांनो,

माझ्याकडून हे पत्र तुमच्यासाठी.तुम्ही कोणत्या कानाकोपऱ्यातून मला वाचताय मला ज्ञात नाही.पण,तुमच्या पर्यंत माझे विचार पोहचतायत हे मी माझं भाग्य मानते.२४ व्या वयापर्यंत मला लाभलेले अनुभव शब्द भंडारातून मी तुमच्या समोर प्रकट केले आहेत.त्यातले तुम्हांला काही आवडतील,पटतील,लागतील, रुचतील,दुसऱ्याला सांगावे वाटतील तर काही आत्मसात ही करावेसे वाटतील. हा प्रश्न तुमचाच आहे.तो न्याय निवडा मात्र सर्वस्वी तुमचाच.आणि वाचनाचा आनंद ही तुमचाच.पण एक गोष्ट राहून गेली.हे पुस्तक तुम्ही वाचलत खरं पण,माझा परिचय द्यायचा राहून गेला.थोडक्यात आपली ओळख व्हायची राहून गेली.ती मी पुस्तकाच्या सुरुवातीलाच प्रस्तावनेत मांडली आहे.बरोबर ना?आता पान उलटायला जाऊ नका. कारण पुस्तकात प्रस्तावनाच गायब आहे.तुमची थोडीशी गंमत केली.खरंतर प्रस्तावनेत तुम्हांला गुंतवून ठेवणं मला आवडल नाही.पुस्तक सुटसुटीत असेल की, थेट लेखकाचा मुद्दा कळतो.आणि दुसऱ्याने त्याच्या आयुष्यात काय काय केलं?हे वाचत बसणं म्हणजे तो प्रत्येकासाठी रटाळवाणा च भाग राहतो.म्हणून आपण प्रस्तावनेची औपचारिकताच टाळली.पण तरी ही मी कधी ही न ठरवलेला प्रवास क्रीडाक्षेत्रातून,शैक्षणिक क्षेत्रात आणि तिथून च विहंग करत साहित्यिक क्षेत्रापर्यंत येऊन पोचलेला आहे.आता तुम्ही म्हणाल प्रस्तावनेत नाही मग पत्रात का सांगताय? कारण,तुम्ही आता माझ्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग आहात.नाभि सोबतच अजून काही भांडार तुम्हांला समाधान देण्यासाठी लवकरच येईल,त्या आधी आपली ओळख व्हावी म्हणून थोडी औपचारिकता.आणि असं ही माझ्या गोष्टी तुम्ही मन लावून वाचाव्यात इतकी मी मोठी नाही.पण हजारो–लाखो पुस्तकांमध्ये तुम्ही तुमच्या वाचनात नाभि ला ही सामील करून घेत आहात त्यासाठी मी तुमची मनापासून आभारी आहे...

आणि थांबा! जाता जाता पुस्तक बंद करायच्या आधी नाभि कशी वाटली, किती जवळची वाटली,किती भावली

**pranotijadhav1652001@gmail.com / 9168131612**

ह्या ईमेल द्वारे अथवा नंबर द्वारे नक्की कळवा.

लेखिका,

प्रणोती प्रतीक्षा प्रल्हाद जाधव